सहल थंड प्रदेशाची
थर्मल • स्वेटर्स • जर्किन
ग्लोज • सॉक्स • कॅप्स्
बरंच काही एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला • कापड बाजार, नं. 9422226599
• यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
• सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

Elite banquet
A.C. बॅन्क्वेट हॉल
अहिल्यानगर मध्ये पहिल्यांदा ए.सी. बॅन्क्वेट हॉल,
भव्य हॉल व प्रशस्त पार्किंग
* वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस
* शुभकार्य, साखरपुडा
* डोहाळे जेवण, मुंज
* नामकरण समारंभ
* कॉर्पोरेट इव्हेंट्स्
व इ. कार्यक्रमासाठी उपलब्ध
हॉटेल संकेत
टिळक रोड, स्वस्तिक चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर
9422222020

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २२.०५.२०२५ | अंक नं. ४४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

फक्त फायदाच फायदा!
खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# सोलर सिस्टिम बसवूनही ग्राहकांना येताहेत विजेची बिले; महावितरणच्या ढिसाळ कारभारावर संघटना व ग्राहक नाराज

नगर - गेल्या वर्षी सुरु झालेल्या पीएम सूर्यघर योजनेत अनेक अडथळे येत असून सौर प्रकल्प बसवूनही ग्राहकांना सरासरी वीज बिल येत आहे. तसेच अनेकांना अद्याप योजनेचे अनुदानही मिळाले नाही. महावितरणच्या दुर्लक्षामुळे ग्राहकांना वीज बिलाचा भुर्दंड बसत असून महावितरणच्या ढिसाळ कारभारावर संघटना व ग्राहक नाराज असल्याची माहिती ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनचे जिल्हा संचालक अमित काळे यांनी दिली.

वारंवार पोर्टलमधील बदल, एजन्सीकडून मीटर बसवण्यात होणारा विलंब त्यामुळे महावितरणकडून बिलाची होणारी आकारणी या सर्वांमुळे ग्राहक त्रस्त झाले असून सोलर सिस्टिम लावून काय उपयोग, असा प्रश्न उपस्थित करत आहेत.

महावितरणने शहरात एनसीसी या एजन्सीमार्फत घरगुती स्मार्ट मीटर व सोलर नेट मीटर बसवण्यात येत आहेत. ज्या ग्राहकांनी सोलर सिस्टीम बसवली आहे त्यांचे जुने मीटर कक्ष कार्यालयात जमा करण्यास ही एजन्सी खूप विलंब करत आहे. त्यामुळे ग्राहकांना अतिरिक्त वीजबिल येत आहे. त्यामुळे ग्राहकांना सरासरी अथवा वाढीव (पुढील मजकूर पान २ वर)

परिमल मंदिर, बेंगलोर की सुवासिक सुगंधवाला!
६ सुवासिक सुगंधासह
शुभलाभ
बेस्ट ६
झीपर पाऊच
६ इन वन, १२० ग्रॅम
फक्त रु. 50 मध्ये
२५ ग्रॅम रु. 10 मध्ये
तसेच-डिओ, कापुर, शेंदूर, अत्तरे, धुप व अगरबत्ती होलसेल व रिटेल साठी
केवल अगरबत्ती
हॉटेल ससरंग समोर, आडते बाजार, अ.नगर
३ फुट पासुन पुढे अल्युमिनियम लॅडर (शिडी) उपलब्ध

उच्च दर्जा.. योग्य किंमत..
हिच तर आमची खासियत..
Available In Top Brands
Hettich HÄFELE GRASS blum ITALICA ebco
NEW BOMBAY Since 1972
KITCHENS & WARDROBE
Ahilyanagar Off.: Excel Arcade, Near HDF Bank, Laltaki, Ahilynagar
Pune Off.: 1, Patil Plaza, Mitra Mandal Chowk, Pune.
Cell.: 98909 85601 I 98222 94670.

शालेय विद्यार्थ्यांसाठी खास ऑफर
आता कॉम्प्युटर सेट 7500 रु.
आकर्षक भेटवस्तू फ्री.. T & C*
सिक्युअर कॉम्प्युटर्स
दिल्लीगेट, अहिल्यानगर
7304099919

सुट्टया लागल्या
भाच्यांना, बहिणीला कपडे घ्यायचेत...?
चला तर मग मयुरी मॉलला
वाचा सुट फ्रॉक पार्टीवेअर ड्रेस व बरेच काही
१५-१६ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींसाठी
सर्वांसाठी सर्व प्रकारचे कपडे
असंख्य नवनवीन व्हरायटीज्
होलसेल पेक्षाही कमी दरात
अहमदनगर जिल्ह्यातील प्रथम भव्य लेडीज मॉल
मयुरी लेडीज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूलजवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर. 9028201188

# वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या निषेधार्थ 'महावितरण' कार्यालयात मेणबत्ती पेटवून आंदोलन

## आठ दिवसात वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास अधिकाऱ्यांना काळे फासण्याचा राष्ट्रवादी काँग्रेसचा इशारा

नगर - अहिल्यानगर शहरामध्ये वारंवार खंडित होत असलेल्या वीज पुरवठ्याच्या निषेधार्थ विद्युत भवन येथे अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयातील वीजपुरवठा बंद करून मेणबत्ती पेटवून प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने निषेध करण्यात आला. येत्या आठ दिवसांमध्ये विद्युत पुरवठा सुरळीत न झाल्यास अधीक्षक अभियंता यांना काळे फासण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

शहरामध्ये ग्राहकांकडून दंडेलशाही पद्धतीने वसुली केली जाते. मात्र त्यांना व्यवस्थित वीजपुरवठा केला जात नाही. मुळा धरण येथे वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे. अधिकारी वर्ग एसी लावून थंड वातावरणात बसतात मात्र नागरिक अक्षरश: गर्मीमध्ये आपली रात्र काढत असतात. नागरिकांनी फोन लावल्यानंतर विद्युत विभागाच्यावतीने कधीही फोन उचलला जात नाही, नागरिकांना मुजोर पद्धतीने उत्तरे दिली जातात. पावसाळ्यापूर्वीच दुरुस्तीचे व झाडांच्या फांद्या तोडण्याचे काम हाती घेणे गरजेचे होते मात्र कुठल्याही उपयोजना न केल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, अशा भावना शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी व्यक्त केल्या.


नगर शहरात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या निषेधार्थ महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांच्या कार्यालयात मेणबत्त्या पेटवत आंदोलन करून निवेदन देताना शिष्टमंडळ. (छाया - लहू दळवी)

वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे व्यापारी, विद्यार्थी, व्यावसायिक यांचे अतोनात हाल होत आहे. पावसाचे थेंब पडण्यापूर्वीच वीज गुल होत असते, आठ दिवसांमध्ये वीजपुरवठा नियमितपणे सुरळीत न झाल्यास अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयामध्ये तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशारा सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे यांनी दिला.

यावेळी अधीक्षक अभियंता श्री. पवार यांनी शिष्टमंडळाशी बोलताना, येत्या ८ दिवसांमध्ये सर्व वीज वाहिन्यांचे देखभालीची कामे पूर्ण करण्यात येतील. त्यानंतर वीज पुरवठा खंडीत होणार नाही. रोहित्राचे डीपी बॉक्स व त्याचे दरवाजे गरजेच्या ठिकाणी त्वरीत बदली करण्यात येतील. रस्त्यामधील असलेले विद्युत पोल महानगरपालिकेच्या समन्वयाने शिफ्ट करण्यात येतील. महावितरण कर्मचाऱ्यांनी तोडलेल्या झाडाच्या फांद्या त्वरीत उचलण्यात येतील, वाकलेले वीज पोल सरळ करण्यात येतील. अतिभारीत असलेले वीज रोहित्राचे ठिकाणी उच्च क्षमतेचे रोहित्र बदलण्यात येतील. तसेच महावितरणच्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचारी यांनी भ्रमणध्वनी स्विकारला नाही तर संबंधितांवर कंपनीच्या नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले.

यावेळी माजी नगरसेवक कुमारसिंह वाकळे, प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, वैभव ढाकणे, मंगेश खताळ, संजय सपकाळ, दीपक खेडकर, सारंग पंधाडे, जॉय लोखंडे, रंजना उकिरडे, साधना बोरुडे, आरती उफाडे, स्वप्नील ढवन, महेश गलांडे, गिरीश जगताप, राहुल कातोरे, अंकुश बोरुडे, संकेत कराड, अमोल जाधव, भगवान काटे, अभिषेक बोरुडे, परेश पुरोहित, दिनेश लंगोटे, दीपक लिपाने, संकेत झोडगे, सुरेश आडसूळ, अमित खामकर, अशोक चोभे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टिक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

MAHA DISCOUNT offer
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
in Any Course
Just 1800/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

कॅन्सर ला घाबरु नका, तज्ञ डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्या!
MEDICAL & SURGICAL ONCOLOGY
आता पूर्ण वेळ अहिल्यानगर मध्ये
INDO IRISH HOSPITAL
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना
आयुष्मान भारत योजना
मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी
व इतर सर्व कॅशलेस इंशुरन्स उपलब्ध...
Tapowan Road, A. Nagar
For Appointment 913042 3336 | 9860310001

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# दादाभाऊ व अभिषेक कळमकर यांच्यावर गुन्हा दाखल करणारा मास्टरमाईंड कोण?

**शहरात खोटे गुन्हे दाखल करण्याची मालिका सुरुच, सखोल चौकशी करा : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाची जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी**



दादाभाऊ कळमकर व अभिषेक कळमकर यांच्यावरील दाखल खोट्या गुन्ह्यांची सखोल चौकशी करावी अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे दिले.

नगर - सध्या नगर शहरामध्ये खोटे गुन्हे दाखल करण्याची मालिका सुरू आहे. त्यातच विरोधी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्याचे षड्यंत्र मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. माजी आमदार दादाभाऊ कळमकर व माजी महापौर अभिषेक कळमकर व त्यांच्या सहकाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करून आवाज दाबण्याचा प्रयत्न काही लोक शहरात करत आहेत. याच्या आधी पण त्यांच्या पदाधिकाऱ्यांवर अशा प्रकारे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले होते. फिर्यादीने नाव बदनाम करण्याच्या हेतूने कळमकर यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. आम्हाला न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे व न्याय नक्कीच मिळणार, याची खात्री आहे. या विषयावर जातीने लक्ष घालून या घटनाची सखोल चौकशी व तपास लवकरात लवकर लावावा व खोटे गुन्हे दाखल करण्यामागचा खरा मास्टरमाईंड कोण आहे? याचासुद्धा तपास लावावा, या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांना दिले आहे.

यावेळी निलेश मालपाणी, सुदाम भोसले, नामदेव पवार, अशोक बाबर, नलिनी गायकवाड, संगीता खिलारी, अल्तमश जरीवाला, किरण सपकाळ, उमेश भांबरकर, राम वाणी, प्रशांत दरेकर, प्रशांत आढाव, सद्दाम सय्यद, सद्दाम शेख, परवेज फैयाज तांबोळी, नूर खान पठाण सचिन नवगिरे, भिमराज कराळे उपस्थित होते.

## प्रेरणादायी अक्षरधन...



"मुसाफिर"-९८२२०२०६९१

### महाराष्ट्रात वाचन संस्कृती रुजली नाही?

There's one question I think we should ask of one another a lot move often, and that's "What are you reading?" It's a simple question but a powerful one, and it can change lives,

Creating a shared universe for people who are otherwise seperated by culture and age and by time and space...

When we ask one another "What are you reading?" isn't a simple question when asked with gerunine curiosity. It's really a way of asking "Who are you now."

वाचन व वाचन संस्कृतीबद्दल हे इंग्रजीत मुद्दाम दिले. कारण बऱ्याचशा विद्यार्थ्यांना मराठी माध्यम नसल्याने मराठी वाचनाची खरी अनुभूती येत नाही.

इंग्रजी किंवा इतर भाषेच्या वाचनात गैर काहीच नाही. तरीपण मातृभाषेतल्या सक्षम शब्दांची, शब्दालंकार, अलंकार, अन्योक्ती या व्याकरणासह साहित्याची सकस व मुलभूत अनुभूतीपूर्ण आनंदासाठी मराठी वाचणे अधिक सोयीस्कर आहे असे वाटते.

२०० वर्षांची परंपरा असूनही महाराष्ट्रीय पुस्तक संस्कृती अद्याप प्राथमिक अवस्थेत आहे असा निष्कर्ष दुर्मिळ पुस्तकांचे संग्राहक, विचक्षण वाचक, समीक्षक प्रा. नितीन रिंढे यांनी काढला आहे. त्यांचं 'लीळा पुस्तकांच्या' हे 'बुक ऑन बुक्स' मध्ये याविषयी ते सविस्तर सांगतात.

## मारुती कळमकर यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी मारुती बापूराव कळमकर (वय ६८) यांचे २२ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अश्विन (बबन) कळमकर यांचे ते वडील होत.

# बालिकाश्रम रोडवर घरफोडी करणाऱ्या सराईत चोरट्यास मुद्देमालासह पकडले



बालिकाश्रम रोडवर घरफोडी करणाऱ्या सराईत चोरट्यास मुद्देमालासह पकडल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर - सावेडी उपनगरातील बालिकाश्रम रोडवरील ताठे मळा येथे घरफोडी करणारा सराईत चोरटा स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पकडला असून त्याच्याकडून पोलिसांनी १ लाख ६६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई माळीवाडा बस स्थानक येथे केली.

या बाबतची हकिगत अशी की, ११ मे रोजी फिर्यादी निलम गणेश क्षीरसागर, (रा.ताठे मळा, बालिकाश्रम रोड) या त्यांचे राहते घराचे कुलूप लावून बाहेर गेल्या असता अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून कपाटातील सोन्याचे चांदीचे दागीने चोरुन नेले होते. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल आहे.

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार संदीप पवार, गणेश भिंगारदे, शाहीद शेख, गणेश धोत्रे, विश्वास बेरड, रविंद्र घुंगासे व प्रशांत राठोड यांच्या पथकाने गुन्ह्यातील आरोपींची माहिती व शोध घेऊन यातील आरोपी समीर बालम शेख, (वय २८, रा. मुकूंदनगर, अ.नगर) व एक विधीसंघर्षित बालक अशांना ताब्यात घेऊन तोफखाना पोलीस ठाण्यात हजर केले होते. तपासात आणखी एक आरोपी रतन रविशंकर अग्रवाल, (रा.वरूर, ता.शेवगाव) यास निष्पन्न करण्यात आले होते. तो गुन्हा केल्यापासुन फरार झाला होता.

२० मे रोजी पथकास माहिती मिळाली की आरोपी रतन अग्रवाल हा माळीवाडा बसस्थानक येथे येणार आहे. ही गोपनीय माहिती मिळताच पथकाने बसस्थानक येथे संशयीत आरोपी रतन अग्रवालचा शोध घेऊन यास ताब्यात घेतले. पथकाने त्याच्या ताब्यातुन १ लाख ६६ हजार रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे विविध प्रकारचे दागीने जप्त केले. आरोपीस मुद्देमालासह तोफखाना पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास तोफखाना पोलीस हे करीत आहेत.

## 'मंगलदिप'च्या कर्जदारास एक महिना कारावासाची शिक्षा व ८०,००० रूपये नुकसान भरपाई

नगर - अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयाने कर्जदार शेखर गोरक्ष गाडेकर, रा. नागरदेवळे अहिल्यानगर यास निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून एक महिना कैद व ८०,००० रुपये नुकसान भरपाईची शिक्षा ठोठावली आहे. रक्कम न भरल्यास ६ दिवस साधी कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाईची रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे.

शेखर गोरक्ष गाडेकर यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही. त्यामुळे संस्थेने शेखर गोरक्ष गाडेकर यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरूण न्यायालयाने कर्जदार शेखर गोरक्ष गाडेकर यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांची साक्षी महत्वाची ठरली.

फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता ॲड. सुहास एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना ॲड. अमित अडागळे व ॲड. विलास ढोणे, ॲड. गौरव हरबा, ॲड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

## अनिल गायकवाड यांचे हृदयविकाराने निधन



नगर - नंदनवननगर, हुंडेकरी लॉन येथील रहिवासी व बीएसएनएलचे सेवानिवृत्त सीईओ अनिल विठ्ठल गायकवाड (वय ६७) यांचे २१ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर सिद्धार्थनगर ख्रिश्चन स्मशानभूमी येथे दफनविधी करण्यात आला.त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. तुषार गायकवाड यांचे ते वडील होत.

# जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी आनंद भंडारी



नगर - नगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांची अमरावतीच्या जिल्हाधिकारीपदी बदली झाली असून त्यांच्या जागी अतिरिक्त जमाबंदी आयुक्त आणि भूमि अभिलेख विभाग पुणे येथील अतिरिक्त संचालक आनंद भंडारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आशिष येरेकर गेल्या सव्वा तीन वर्षांपासून नगरमध्ये कार्यरत होते.

राज्य सरकारच्या वतीने राज्यातील आठ आयएएस अधिकार्यांच्या बदल्यांचे आदेश २१ मे रोजी सायंकाळी काढण्यात आले आहेत. यात येरेकर यांच्या जागी पुण्याहून भूमी अभिलेख विभागातून आनंद भंडारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भंडारी यांचे मूळ गाव बेल्हे (ता. जुन्नर, जि पुणे) असून त्यांनी राहुरी कृषी विद्यापीठात बी.एस्सी.ॲग्री पदवी घेतलेली आहे. तसेच भंडारी हे नगरचे जावई असून त्यांच्या पत्नी डॉ.स्मिता भंडारी या नगर मधील सीए स्व.पी.एम. फिरोदिया व ॲड. शोभा फिरोदिया यांच्या कन्या आहेत.

शासकीय सेवेत रुजू झाल्यावर ते सन २००१ ते २००२ - नायब तहसीलदार, सातारा, २००२ ते २००३ - परिविक्षाधीन गट विकास अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, २००३ ते २००७ - गट विकास अधिकारी, पंचायत समिती खेड, पुणे जिल्हा, २००७ ते २०११ - गट विकास अधिकारी, पंचायत समिती जुन्नर, २०११ ते २०१४ - उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पुणे, २०१४ ते २०१८ - उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, सातारा, २०१८ ते २०१९ - प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अमरावती, २०१९ ते २०२१ - अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड, २०२१ ते २०२४ - संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य अशी सेवा केली.

राज्य शासन व केंद्रीय लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांनी घेतलेल्या परीक्षा व मुलाखतीद्वारे २४ मे, २०२४ रोजी भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये (आयएएस) त्यांची निवड झाली. त्यांनी ५ जून २०२४ रोजी अतिरिक्त आयुक्त, जमाबंदी व भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे या पदाचा पदभार घेतला होता. आता ते नगर जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी पद सांभाळणार आहेत.

## पुरुषोत्तम वैकर यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - पुणे येथील रहिवासी पुरुषोत्तम एकनाथ वैकर (वय ७६) यांचे १९ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्यामागे ३ भाऊ, भावजया, २ बहिणी, २ मुले, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते व्हिआरडीई मधून टेक्नीकल ऑफीसर पदावरुन सेवानिवृत्त झाले होते.

## सोलर सिस्टिम बसवूनही ग्राहकांना येताहेत विजेची बिले

(पान १ वरुन)

बिल आल्यामुळे ते महावितरणच्या अधिकाऱ्यांना व सौर व्यावसायिक यांना जाब विचारत आहेत.

सौर व्यावसायिक संघटनेने याबाबत महावितरणचे अधिक्षक अभियंता यांच्याकडे तक्रार केल्यावर अतिरिक्त कार्यकारी अभियंता भाऊसाहेब कुमावत यांनी सौरव्यावसायिक, एनसीसी एजन्सी यांची नुकतीच संयुक्त बैठक घेतली. पुरेसे मनुष्यबळाअभावी वीज मीटर एजन्सीकडून मीटर गोळा करण्यास प्रमाणापेक्षा जास्त उशीर होत असल्याचे काबुल केले. यावर उपाययोजना म्हणून सौर व्यावसायिक एजन्सीला मदत करणार असून त्याचा लवकरात लवकर ग्राहकांना लाभ मिळावा हा उद्देश आहे.

या बैठकीला एजन्सीतर्फे महाराणा व दिनेश येवले, ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जीचे असोसिएशनचे जिल्हा संचालक अमित काळे, भूषण बंग, नारायण शिरसाठ, निलेश चिपाडे, दिलीप वडे, अभिषेक कोतकर, प्रशांत दरेकर आदी उपस्थित होते.

# नगरमध्ये रस्त्यात वाहतुकीला अडथळा करणाऱ्या १३ हातगाडी चालकांवर पोलिसांनी केली कारवाई

नगर - रस्त्याच्या मध्ये हातगाड्या लावून वाहतूक कोंडी होऊन अपघाताची परिस्थिती निर्माण करणाऱ्या १३ हातगाडी चालकांवर तोफखाना पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. ही कारवाई २१ मे रोजी रात्री मिस्कीन मळा, तारकपूर स्टँड जवळ, पारशा खुंट व कोठला येथे केली.

या कारवाईत तोफखाना पोलिसांनी मिस्किन मळा रोडवर शुजवाला नावाची गाडी रस्त्यात उभी करणाऱ्या शकील रफिक सय्यद (वय ४६, रा. टॉप पेट्रोल पंपासमोर, दर्गाजवळ, अ. नगर), चाट सेंटर नावाची गाडी लावणाऱ्या जावेद इम्तियाज अन्सारी (वय ३८, रा. गजानन नगर, अ.नगर) यांच्याविरुद्ध कारवाई केली. तारकपुर स्टॅड जवळ रोडच्या मध्ये फळाची गाडी लावणाऱ्या इस्माईल मुराद पठाण (वय २१, रा. गोविंदपुरा, अ.नगर) याच्यावर कारवाई केली. पारशाखुंट येथे रस्त्याच्या मध्ये मलई दुधाची गाडी लावणाऱ्या इस्तेखार खलील बागवान (वय ३८, रा. पिंजारगल्ली,अ. नगर) याच्यावर कारवाई केली.

कोठला परिसरात बसू समोसाची गाडी लावणाऱ्या जुबेर सादिक शेख (वय ३३, रा. बारा इमाम कोठला), वडापावची गाडी रस्त्यात लावणाऱ्या शहाबाद कलीम शेख (वय २९, रा. मुकुंद नगर), रस्त्यात चहाची गाडी लावणाऱ्या सय्यद रफिक अब्दुल्ला (वय ५४, रा. कोठला), बापूशाह पान स्टॉल नावाची हातगाडी लावणाऱ्या इलियास कासम शेख (वय ५९, रा. कोठला), शोरम चिकन नावाची गाडी लावणारा अलकाइज अल्ताफ शेख (वय २४), सर्फराज बशीर कुरेशी (वय ४५, दोघे रा. कोठला), आरबीएम शोरमा नावाची हातगाडी लावणाऱ्या शाबान असलम खान (वय २२ रा. कोठला), समीर नावाची गाडी लावणारे गफार अब्दुल गणी (वय २७),युनूस हनीफ तांबोळी (वय ३४ दोघे रा. कोठला) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८५ प्रमाणे १३ विविध गुन्हे दाखल केले आहेत. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पोलिस अंमलदार सावळेराम क्षीरसागर, महेश पाखरे, बाळासाहेब भापसे आदींनी केली आहे.

## ज्येष्ठ नागरिक जयंतराव जाधव यांचे निधन



नगर - बलरामनगर बंगडीवाला चौक, बंधन लॉन, सावेडी परिसरातील ज्येष्ठ नागरिक, पूर्णवाद परिवाराचे ज्येष्ठ उपासक जयंत एकनाथराव जाधव (वय ६६) यांचे २० मे रोजी रात्री निधन झाले.

त्यांच्यामागे पत्नी, भाऊ, भावजयी, बहिणी असा परिवार आहे. दिवंगत जाधव हे व्हिडिओकॉन कंपनीत अधिकारी होते. न्यू आर्ट्स महाविद्यालयातील जीवशास्त्र विभागाच्या निवृत्त प्राध्यापिका हेमा जाधव यांचे ते पती होत. दिवंगत जाधव यांना फोटोग्राफी, नाट्यकला यामध्ये आवड होती. त्यांच्यावर मंगळवारी रात्री अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## झाडाला गळफास घेत आत्महत्या



महादेव वाघ

नगर - घराच्या बाजूला असलेल्या झाडाला गळफास घेऊन ३८ वर्षीय इसमाने आत्महत्या केल्याची घटना २१ मे रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास पाईपलाईन रोडवरील शिलाविहार कॉलनी येथे घडली. महादेव शिवाजी वाघ असे मयत व्यक्तीचे नाव आहे.

महादेव वाघ यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यांची पत्नी प्रियंका वाघ यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून ते उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले. याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. वाघ यांनी दिलेल्या माहितीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत महादेव वाघ यांच्या पार्थीवावर श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले, दोन भाऊ असा परिवार आहे.

## एमआयडीसीतील गुन्हेगारी टोळीविरोधात लावला 'मोक्का'

नगर - सावेडीतील तपोवन रस्ता परिसरातून अपहरण केलेल्या वैभव शिवाजी नायकोडी (वय १९) या युवकाचा खून करून मृतदेह जाळणाऱ्या लपका सोमवंशी टोळीविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी (मोक्का) कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. तोफखाना पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावाला नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी मंजुरी दिली आहे. यामुळे दाखल गुन्ह्यात 'मोक्का'चे कलम वाढविण्यात आले आहे.

तपोवन रस्त्यावरील सलूनच्या दुकानाजवळून चारचाकी वाहनातून आलेल्या चौघांनी वैभव नायकोडी याचे २२ फेब्रुवारी २०२५ रोजी अपहरण करून पळून नेले होते. मारहाण करून त्याचा खून करण्यात आला होता व नंतर मृतदेह एमआयडीसी परिसरातील केकताई डोंगरात जाळून टाकला होता. याबाबत त्याची आई सिमा शिवाजी नायकोडी (रा. ढवणवस्ती, सावेडी) यांनी २७ फेब्रुवारी रोजी तोफखाना पोलिसांत फिर्याद दिली होती. पोलिसांनी एकूण ११ संशयित आरोपींविरूध्द अपहरण, खून, पुरावा नष्ट करणे आदी गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला होता.

पोलिसांनी टोळीतील सर्व संशयित ११ आरोपींना अटक करून त्यांच्याविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी (मोक्का) कायद्यान्वये कारवाई करण्यासाठी प्रस्ताव तयार केला व तो विशेष पोलीस महानिरीक्षक कराळे यांना सादर केला. महानिरीक्षक कराळे यांनी सदर टोळीविरोधात मोक्का कलमान्वये कारवाई करण्यास परवानगी दिल्याने सदर दाखल गुन्ह्यात 'मोक्का'चे वाढीव कलम लावण्यात आले आहे. अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती करीत आहेत.

### टोळीत ११ सराईत गुन्हेगारांचा सहभाग

या टोळीत एकूण ११ सराईत गुन्हेगारांचा सहभाग असून त्या सर्व जणांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये टोळी प्रमुख अनिकेत ऊर्फ लपका विजय सोमवंशी (वय २३), टोळी सदस्य सुमित बाळासाहेब थोरात (वय २४), महेश मारूतीराव पाटील (वय २६), नितीन ऊर्फ निशीकांत अशोक ननवरे (वय २५), करण उर्फ तुंडा सुंदर शिंदे (वय २६), विशाल दीपक कापरे (वय २२), रोहित बापुसाहेब गोसावी (वय २०), विकास अशोक गव्हाणे (वय २३), स्वप्नील रमाकांत पाटील (वय २३), राहुल बंडु पाटोळे (वय १९) व ऋतिक उर्फ सोन्या मनोज घोडके (सर्व रा. नवनागापूर, एमआयडीसी) यांचा समावेश आहे.

## धनादेश न वटल्याप्रकरणी ६ महिन्याची कैदेची शिक्षा व १२ लाख २३ हजार रुपये दंड

नगर - अहमदनगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट नंबर १९, डी.डी. कर्वे यांनी आरोपी रेवणनाथ गंगाराम इंगळे यांना ६ महिन्यांचा साधा कारावास व रक्कम रुपये १२ लाख २३ हजार रुपये दंड देण्याचे आदेश दिले आहे. आरोपी रेवणनाथ गंगाराम इंगळे यांनी फिर्यादी भारतीय मल्टीस्टेट कॉपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड जामखेड रोड यांच्याकडून कर्ज घेतले होते. त्याचे परताव्यापोटी त्यांनी सोसायटीस धनादेश दिलेला होता. सदर धनादेश न वटल्याने फिर्यादी सोसायटीने त्यांच्याविरुद्ध न्यायालयात प्रकरण दाखल केले होते. या प्रकरणांमध्ये कोर्टाने आलेल्या पुराव्याचा विचार करून आरोपींना ६ महिन्याचा साधा कारावास व १२ लाख २३ हजार रुपये रकमेचा दंड ठोठावला आहे. दंड रक्कम न भरल्यास पंधरा दिवसांचा साधा कारावास अशी शिक्षा देण्याचे आदेश केले आहे. सदर प्रकरणात फिर्यादी सोसायटीच्या वतीने ॲड. अमित विजय राशिनकर यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. मिलिंद घोरपडे यांनी सहकार्य केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## खेलो इंडिया बीच गेम २०२५ मध्ये मल्लखांब स्पर्धेत अहिल्यानगरच्या ओम सानपने पटकाविले रौप्यपदक



नगर – भारत सरकारचा उपक्रम खेलो इंडिया बीच गेम २०२५ मध्ये मल्लखांब स्पर्धेत अहिल्यानगरचा उदयोन्मुख खेळाडू ओम घनश्याम सानप याने सांघिक क्रीडा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करून रौप्यपदक पटकाविले.

नुकतीच ही स्पर्धा गुजरातमधील ब्ल्यू फ्लॅग बीच दिव दमन येथे झाली. या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र मल्लखांब संघात सानप याने राज्याचे प्रतिनिधित्व केले. या स्पर्धा पुरलेला मल्लखांब, टांगता मल्लखांब तसेच दोरीवरील मल्लखांब या क्रीडा प्रकारात घेण्यात आल्या. या तिन्ही प्रकारामध्ये ओम सानप तसेच महाराष्ट्र संघाने उत्कृष्ट कामगिरी करून द्वितीय क्रमांकाचे विजेतेपद मिळविले.

ठाणे येथे झालेल्या राज्य निवड चाचणी स्पर्धेतून राज्यातील उत्कृष्ट सहा मुलांची या स्पर्धेसाठी निवड करण्यात आली होती. सर्वच खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन केले. या संघात ओम सानप (अहिल्यानगर), कौशिक राजगुरू (ठाणे), राहुल कताळे (पुणे), चेतन मंक्रे (जळगाव), स्वराज पाटील (नाशिक), ओम खामकर (पुणे) या खेळाडूंचा समावेश होता.

ओम सानप हा मार्कंडेय विद्यालयाचे क्रीडा शिक्षक कै. गणपत सानप सर यांचा नातू असून, क्रीडा शिक्षक महासंघाचे राज्य खजिनदार व तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या राज्य संघटनेचे उपाध्यक्ष घन:श्याम सानप आणि चक्रधर स्वामी प्राथमिक विद्यालयाच्या आदर्श शिक्षिका क्रांती सानप–पालवे यांचा मुलगा आहे. त्याने माध्यमिकचे शिक्षण श्री मार्कंडेय विद्यालय गांधी मैदान येथे घेतले असून, ना. ज. पाऊलबुद्धे विद्यालय येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे.

एम.एम.वाय.टी.सी. प्रेमदान चौक या क्लबचा तो खेळाडू असून गेल्या पाच वर्षांपासून तो मुख्य प्रशिक्षक उमेश झोटिंग, प्रणिता तरोटे, आप्पा लाडाने आदींच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज सर्किटद्वारे ऐतिहासिक पर्यटनाचा लाभ घ्यावा

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे आवाहन

नगर – भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (आयआरटीसीटी) ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' या एका विशेष रेल्वेची घोषणा केली आहे. ही यात्रा 'भारत गौरव टुरिस्ट ट्रेन' अंतर्गत ९ जून पासून सुरू होत आहे. या सहलीद्वारे महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या ठिकाणांचा पर्यटकांनी अनुभव घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी केले आहे.

या ५ दिवसांच्या विशेष प्रवासात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत. भारत गौरव ट्रेनच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तेजस्वी इतिहासाशी निगडीत धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना व्यापक प्रसिद्धी मिळवून देण्याचा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा मानस आहे. याबाबत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

यात्रेदरम्यान गडकोटावर, ऐतिहासिक स्थळी पर्यटकांना आवश्यक सुविधा देण्यात येणार आहेत.

**सहल तपशील – सहलीचे नाव :** छत्रपती शिवाजी महाराज सर्किट, शुभारंभ ९ जून, कालावधी : ५ दिवस / ६ दिवसांची यात्रा (सकाळी समाप्ती), प्रारंभ व समाप्ती स्थान : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई, प्रवास सुरु व संपण्याचे स्थानक : दादर, ठाणे. यात्रेचा प्रवास–मार्ग – मुंबई (सीएसएमटी)–रायगड–पुणे–शिवनेरी–भीमाशंकर–प्रतापगड–कोल्हापूर–पन्हाळा– मुंबई.

**प्रमुख स्थळांची माहिती** – रायगड किल्ला – छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक येथे झाला व ही राजधानी होती., लाल महाल, पुणे – छत्रपती शिवाजी महाराज यांचे बालपण येथे गेले., कसबा गणपती व शिवसृष्टी,पुणे –पुण्याचे ग्रामदैवत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील संग्रहालय., शिवनेरी किल्ला – छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थळ., भीमाशंकर ज्योतिर्लिंग – १२ ज्योतिर्लिंग पैकी एक प्रमुख धार्मिक स्थळ., प्रतापगड किल्ला – अफझल खानावरील ऐतिहासिक विजयाचे ठिकाण., कोल्हापूर – महालक्ष्मी मंदिर, पन्हाळा किल्ला – बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्याचे प्रतीक.

**पॅकेज शुल्क (प्रति व्यक्ती) :** – उपरोक्त सहलासाठी विविध पॅकेजिस तयार करण्यात आली असुन सोयीनुसार इकोनॉमी (एसएल), कम्फर्ट (३ एसी), सुपीरियर (२ एसी) अशा प्रकारच्या सुविधांची निवड करता येणार आहे. सदरच्या पॅकेज बाबत सविस्तर माहिती आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

**पॅकेजमध्ये समाविष्ट सेवा :** – भारत गौरव ट्रेनने प्रवास, वातानुकूलीत/ विनावातानुकूलीत हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था, सर्व ठिकाणी स्थानिक वाहतूक व गाईड, ऑनबोर्ड व ऑफबोर्ड शुद्ध शाकाहारी भोजन, प्रवास विमा, सर्व प्रवेश शुल्क (किल्ले, मंदिरे, रोपवे, शिवसृष्टी इत्यादी), सुरक्षा व्यवस्था.

**पॅकेजमध्ये नसलेल्या सेवा :** – साहसी खेळ, बोटिंग इत्यादी., खोलीतील सेवांसाठी वेगळी रक्कम आकारली जाईल., इतर कोणताही वैयक्तिक खर्च., कोणतेही अतिरिक्त पर्यटन स्थळ.

**दैनंदिन टूर कार्यक्रम (संक्षिप्त) :** – पहिला दिवस: मुंबई – रायगड – पुणे., दुसरा दिवस: पुणे (लाल महाल, शिवसृष्टी, कसबा गणपती)., तिसरा दिवस: शिवनेरी – भीमाशंकर – पुणे., चौथा दिवस: प्रतापगड – कोल्हापूर., पाचवा दिवस: कोल्हापूर – महालक्ष्मी मंदिर – पन्हाळा किल्ला – मुंबई., सहावा दिवस: मुंबई (टूर समाप्त).

आरक्षण व अधिक माहिती साठी संकेतस्थळ– www.irctctourism.com

## भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ विश्व हिंदू परिषद दुर्गावाहिनी व मातृशक्तीच्या पुढाकाराने महिलांची नगरमध्ये 'तिरंगा रॅली'



भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ विश्व हिंदू परिषद दुर्गावाहिनी व मातृशक्तीच्या पुढाकाराने महिलांच्या तिरंगा रॅलीमध्ये सहभागी झालेल्या महिला.

नगर – ऑपरेशन सिंदूर या नावाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय सैन्याने पाकिस्तान मधील अतिरेक्यांच्या तळावर एअर स्ट्राइक करून नऊ तळ उध्वस्त केले. भारतीय सैन्याचे अभिनंदन करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. म्हणूनच अहिल्यानगरकरांच्या मनात असलेली देशाबद्दल व सैन्याबद्दल भावना आणखी सुदृढ करण्यासाठी महिला तिरंगा रॅलीचे आयोजन विश्वहिंदू परिषद दुर्गावाहिनी व मातृशक्तीचा पुढाकाराने करण्यात आले. महिलांच्या तिरंगा रॅली मध्ये विश्व हिंदू परिषद दुर्गा वाहिनी जिल्हा संयोजिका जयश्री पोटे, हेमलता कांबळे, अजिता एडके, अलका वाघ, मंजुषा कुलकर्णी, पूनम कुलकर्णी, हिरा शहापूरे, सुनीता देव, नंदिनी जोशी, वंदना मोडक, सुनंदा तरोटे, दीपा कांबळे, पूनम भट, दिपाली भट, शितल भट, चंद्रकला गोयल, मीना गोयल, मंगल गौरीधर, प्रज्ञा जोशी, सविता पुंड, चंचू कापसे, शोभा भालसींग आदींनी सहभाग घेतला.

या रॅलीमध्ये भारत माता की जय, ऑपरेशन सिंदूर चे स्वागत, जय श्रीराम या घोषणा देण्यात आल्या. तिरंगा रॅलीची सुरुवात दिल्लीगेट येथील विश्व हिंदू परिषद कार्यालयापासून करण्यात आली. यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, चितळे रोड, नेतासुभाष चौक येथे सांगता समारोप करण्यात आला. यानंतर विश्व हिंदू परिषदेच्या कार्यालयात पूर्वसैनिक हरीश औटी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, गजेंद्र सोनवणे, वीरेंद्र शिंदे, राजेंद्र चुंबळकर आदी उपस्थित होते.

## ९ वर्षांखालील खेळाडूंसाठी जिल्हास्तरीय बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

नगर – अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेमार्फत ९ वर्षांच्या खालील खेळाडूं म्हणजे १/१/२०१६ नंतर जन्मलेले नगर जिल्ह्यातील खेळाडू साठी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा आयोजित केली आहे. गायत्री मंगल कार्यालय, महाजन गल्ली, नगर येथे सदरील स्पर्धेचे नियोजन केले असून २४ मे रोजी सकाळी १० वाजता स्पर्धे चे उद्घाटन केले जाईल. सोलापूर येथे होणाऱ्या राज्य स्पर्ध साठी अहिल्यानगर जिल्ह्याचा मुलांचा व मुलींचा संघ या स्पर्धेतून निवडण्यात येणार आहे. अंतिम निकाल पत्रका प्रमाणे २ मुले व २ मुली, म्हणजेच प्रथम २ खेळाडू राज्यस्तरावर पाठविण्यात येतील. अहिल्यानगर जिल्ह्यातून निवड झालेल्या खेळाडूंची राज्य निवड चाचणी स्पर्धेची प्रवेश फी, रू ८०० संघटनेमार्फत भरली जाईल व तेथे राहण्याची व्यवस्था सुद्धा केली जाईल. पहिल्या पाच खेळाडूंना (मुले व मुली) आकर्षक करंडक सुद्धा देऊन गौरविण्यात येणार आहे

सदरील स्पर्धा ९ वर्षा खालील मुले व मुली खेळाडूंसाठी खुली असून खेळाडूंनी येताना बुद्धिबळ पट, सोंगट्या, जेवणाचा डबा व पिण्याचे पाणी आणावे. सर्व सहभागी खेळाडूंनी सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रवेश ऑनलाईन किंवा वॉट्सअप वर स्वीकारले जाणार आहेत.

स्पर्धा यशस्वी करण्याकरिता अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटना प्रयत्नशील असून अहिल्यानगर जिल्ह्यातील अधिकाधिक खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी केले आहे.

निवड चाचणी स्पर्धेतील प्रवेश नोंदणी करता व माहितीकरिता:– यशवंत बापट ९३२६०९२५०१, पारूनाथ ढोकळे ९८५०७०४२६८, देवेंद्र ढोकळे ८६००४१२६३३, प्रशांत धंगेकर ९९२१३७७९८८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे अवाहन अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेने केले आहे. सहभाग घेण्यासाठी खालील फॉर्म भरून प्रवेश निश्चित करा.



मराठी साहित्य मंडळ (मुंबई) या संस्थेच्या नगर तालुका अध्यक्षपदी पै. नाना डोंगरे यांची नुकतीच निवड झाल्याबद्दल खासदार निलेश लंके यांनी त्यांचा विशेष सत्कार करून गौरव केला.

## खा. निलेश लंके यांच्याकडून पै. नाना डोंगरे यांचा गौरव

नगर – मराठी साहित्य मंडळ (मुंबई) या संस्थेच्या नगर तालुका अध्यक्षपदी पै. नाना डोंगरे यांची नुकतीच निवड झाल्याबद्दल खासदार निलेश लंके यांनी त्यांचा विशेष सत्कार करून गौरव केला.

यावेळी मराठी साहित्य मंडळाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब देशमुख, साहित्यिक भारत सातपुते, कवी आनंदा साळवे, गझलकार रज्ज़ाक शेख, कवयित्री सरोज आल्हाट, साहेबराव बोडखे, भागचंद जाधव आदी उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे हे गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण भागात साहित्य चळवळ अधिक जोमाने उभी करण्यासाठी कार्यरत आहेत. त्यांच्या पुढाकाराने नुकतेच निमगाव वाघा (ता. नगर) येथे पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. तसेच त्यांनी राज्यस्तरीय आठ काव्य संमेलनांचे आयोजन करून नवोदित कवी, साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून त्यांना चालना देण्याचे काम केले. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन मराठी साहित्य मंडळ (मुंबई) या संस्थेच्या नगर तालुका अध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती व जिल्ह्याचे नामांतर एकाच वर्षात होणे हा 'सुवर्ण योगायोग'

### प्रा. भानुदास बेरड यांचे प्रतिपादन; शहर भाजपच्या वतीने पदाधिकारी कार्यशाळेचे आयोजन



अहिल्यानगर शहर भारतीय जनता पार्टीच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी निमित्ताने आयोजित पदाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत बोलताना प्रमुख वक्ते प्रा.भानुदास बेरड. यावेळी अ‍ॅड. अभय आगरकर, पदाधिकारी उपस्थित होते.

नगर – भारतभर कार्य कर्तृत्व गाजवणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे नाव आपल्या जिल्ह्याला मिळाले आहे. झालेले हे नामांतर अभिमानास्पद व परिवर्तन करणारे आहे. अहिल्यादेवींची त्रिशताब्दी जयंती व जिल्ह्याचे नामांतर एकाच वर्षात होणे हा सुवर्ण योगायोग आहे. अशा महान कर्तृत्ववान स्त्रीच्या कार्याची ओळख आपल्या नव्या पिढीला होणे आवश्यक आहे. यासाठी अहिल्यादेवींचे चरित्र नव्या पिढीपुढे ठेऊन सनातन पिढी निर्माण करा. शहर भाजपाने त्रिशताब्दी निमित्त कार्यक्रमांचे आयोजन करून स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे, असे प्रतिपादन प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रा.भानुदास बेरड यांनी केले.

अहिल्यानगर शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी निमित्ताने आयोजित पदाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत प्रमुख वक्ते प्रा.भानुदास बेरड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी शहर जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. अभय आगरकर होते. यावेळी प्रा.बेरड यांनी व्याख्यानातून पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा जीवनातील प्रमुख प्रसंगांची माहिती देऊन त्यांनी देशभर केलेल्या कार्याची माहिती दिली.

अ‍ॅड. अभय आगरकर म्हणाले, त्रिशताब्दी निमित्त शहर भाजपाच्यावतीने अनेक उपक्रम, स्पर्धा, परिसंवाद, कार्यशाळा व व्याख्यानांचे आयोजन केले आहे. शहरातील प्रत्येक भागात ३१ मेपर्यंत हे उपक्रम चालणार आहेत. या माध्यमातून पक्षाचा प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्ता जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचणार आहे, असे सांगून कार्यक्रमांची माहिती दिली.

प्रास्ताविकात सावेडी मंडल अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा जन्म आपल्या नगर जिल्ह्यात झाला आहे. हे आपल्यासाठी अभिमानास्पद आहे. आपल्या नगरचे झालेले नामांतर सार्थ होण्यासाठी अहिल्यादेवींनी देशभर जे कार्य उभारून जनसेवा केली ते सर्व नागरिक व नव्या पिढीपर्यंत नेण्यासाठी शहर भाजपने पुढाकार घेतला आहे.

शहर सरचिटणीस प्रशांत मुथा यांनी स्वागत केले. ज्योती दांडगे यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय दिला. रेणुका करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले. महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे यांनी आभार मानले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सर्वपंथीय ख्रिस्ती वधू-वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून ख्रिस्ती समाजाला संघटितरित्या विकास प्रवाहात आणावे

### डॉक्टर सुधीर तांबे यांचे प्रतिपादन; महाराष्ट्र अल्पसंख्यांक ख्रिस्ती विकास परिषद व साप्ताहिक उपदेशकचा स्तुत्य उपक्रम



राज्यस्तरीय सर्व पंथीय ख्रिस्ती वधु–वर परिचय मेळाव्या प्रसंगी बोलताना डॉ. सुधीर तांबे.

संगमनेर – महाराष्ट्र अल्पसंख्यांक ख्रिस्ती विकास परिषद व साप्ताहिक उपदेशकच्या माध्यमातून राज्यस्तरीय सर्व पंथीय ख्रिस्ती वधू–वर परिचय मेळाव्याबरोबरच विविध उपक्रमाच्या माध्यमातून ख्रिस्ती समाजाचे संघटन करून त्यांना विकास प्रवाहामध्ये आणावे, असे प्रतिपादन माजी आ.डॉ.सुधीर तांबे यांनी केले.

हॉटेल पंचवटी हॉलमध्ये राज्यस्तरीय सर्व पंथीय ख्रिस्ती वधु–वर परिचय मेळाव्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी दीपप्रज्वलन करण्यात आले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सेंट मेरी चर्चचे धर्मगुरू फा.ज्यो.गायकवाड हे होते. तर व्यासपीठावर प्रा.बाबा खरात, रत्नाकर पगारे, डॉ.अरविंद सांगळे, अशोक गायकवाड, रेव्ह.प्रकाश लोखंडे, ख्रिस्ती विकास परिषदेचे अध्यक्ष अनिल भोसले, साप्ताहिक उपदेशकचे विक्रम गायकवाड, जिल्हाध्यक्ष दीपक कदम, बी.के.गायकवाड, लाजरास केदारी, उद्योजक नितीन खामकर, यशस्वी फाउंडेशनचे अध्यक्ष आदित्य घाटगे आदी उपस्थित होते.

डॉ.तांबे म्हणाले की, ख्रिस्ती समाज शांतता प्रिय असून मिशनऱ्यांनी देशाच्या विकास प्रवाहामध्ये शिक्षण व आरोग्य क्षेत्राच्या माध्यमातून भरीव योगदान दिले आहे. शिक्षण व व्यवसायाच्या दृष्टीने समाजाने पुढाकार घ्यावा या वधू– वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून अनुरूप व योग्य वधू वर जोडले जातील तर अनावश्यक खर्चाला फाटा देऊन साधेपणाने विवाह करावा मेळाव्याचे आयोजक अनिल भोसले व विक्रम गायकवाड यांचेही यावेळी त्यांनी कौतुक केले.

वधु–वर परिचय मेळावा व विविध उपक्रमांच्या माध्यमातून ख्रिस्ती समाज संघटित होण्यास मदत होईल ही काळाची गरज असल्याचे उपस्थित मान्यवरांनी मनोगतातून आपल्या भावना व्यक्त केल्या. अहिल्यानगर औरंगाबाद, पुणे, नाशिक, मुंबई, ठाणे, अहमदाबाद येथून वधू–वरांनी सहभाग घेऊन दीडशेच्या वर नोंदणी करण्यात आली.

मेळावा यशस्वीतेसाठी पा. शिवाजी लांडगे, पा.दीपक शेळके, बाळासाहेब साळवे, लाजारस केदारी, सविता गायकवाड, प्रभाकर चांदेकर, प्रशांत यादव, सुहास गायकवाड, सिमोन रूपटक्के, सचिन मंतोडे, फ्रान्सिस सोनवणे, सनी गायकवाड, आदित्य घाटगे, रोहित रोहोम, बेनाडीट केदारी, शशीभाऊ पगारे, फ्रान्सिस रोहोम, दिलीप गायकवाड आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक विक्रम गायकवाड यांनी केले तर अनिल भोसले यांनी आभार मानले.

## सप्लाय डेपो रेजिमेंटतर्फे डॉ. उद्धव शिंदे यांचा गौरव



सामाजिक कार्याबद्दल डॉ. उद्धव शिंदे यांचा गौरव करताना मेजर रोहित कुमार, सुभेदार मेजर संजयसिंग मलिक, कॅप्टन अंकित.

नगर – सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, वंचित, गरजू अशा विविध घटकांतील नागरिकांना तसेच पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करणारे स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा सामाजिक कार्याबद्दल अहिल्यानगरच्या लष्करातील सप्लाय डेपो रेजिमेंटतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी मेजर रोहित कुमार, सुभेदार मेजर संजयसिंग मलिक, कॅप्टन अंकित यांनी डॉ. उद्धव शिंदे यांच्या सामाजिक कार्याची दखल त्यांचा शाल व पुस्तक देऊन गौरव केला.

### पाठीवर पडणारी कौतुकाची थाप घडवू शकते इतिहास

ज्यासमाजातआपणराहतो,त्यासमाजाचे आपण कायम ऋणी असतो. हे समाजऋण फेडण्यासाठी, समाजाच्या भल्यासाठी स्नेहबंधच्या माध्यमातून काम करत आहे. या कार्याबद्दल आज लष्करातील सप्लाय डेपो रेजिमेंटने सत्कार केला, त्याबद्दल त्यांचे आभार. प्रोत्साहन माणसाला बळ देतं. योग्य वेळी पाठीवर पडणारी कौतुकाची थाप. येणाऱ्या काळात इतिहास घडवू शकते, अशी प्रतिक्रिया डॉ. उद्धव शिंदे यांनी यावेळी दिली.




जिल्हा परिषदेत पाणी गुणवत्ता तपासणी मोहीमेच्या शुभारंभप्रसंगी बोलताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर व इतर अधिकारी.

# पाणी गुणवत्ता तपासणी व जनजागृतीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यात 'विशेष मोहीम'

### नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून द्या – आशिष येरेकर

नगर – जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची रासायनिक व जैविक गुणवत्ता तपासण्यासाठी ७ जूनपर्यंत क्षेत्रीय तपासणी संचाद्वारे (एफ.टी.के) पाणी गुणवत्ता तपासणी व जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व १५७५ गावांत ही मोहीम राबवून नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेत पाणी गुणवत्ता तपासणी मोहीमेंचा शुभारंभप्रसंगी श्री.येरेकर बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, सुभाष सातपुते, दादाभाऊ गुंजाळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे तसेच सर्व गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी उपस्थित होते.

पाणी गुणवत्ता तपासणी मोहिमेंतर्गत केंद्र शासनाच्या सूचनेनुसार गावपातळीवर एफ.टी.के. संचाद्वारे रासायनिक व जैविक तपासणीसह जनजागृती अभियान राबविले जाणार आहे. यामध्ये गावांमध्ये पाणी तपासणीसाठी निवडलेल्या व संकेतस्थळावर नोंदविलेल्या पाच महिलांची पडताळणी, प्रशिक्षण नोंदी, तसेच आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना एफ.टी.के. किटद्वारे प्रात्यक्षिके देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या साहाय्याने शाळा, अंगणवाड्या, घरगुती नळजोडण्यांतील पाण्याचे नमुने तपासले जातील. संबंधित माहिती 'डब्ल्यूक्यूएमआयएस' पोर्टलवर नोंदविली जाईल.

नळ पाणी पुरवठा योजनांचे स्त्रोत, शाळा, अंगणवाड्या व घरगुती नळजोडण्यांची तपासणी करण्यासाठी रासायनिक व जैविक एफ.टी.के. संचांचे वाटप करण्यात येईल. स्थानिक नागरिकांना पाणी गुणवत्ता तपासणीचे महत्त्व व त्याचे फायदे सांगण्यात येणार आहेत.

या मोहीमेची जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतस्तरावर प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाईल. या संपूर्ण कालावधीत १५७५ गावांमध्ये एफ. टी. के. द्वारे पाणी गुणवत्ता तपासणी करण्यात येणार आहे. सर्व शासकीय यंत्रणांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा. या मोहिमेमध्ये ग्रामपंचायत विभाग, महिला व बालकल्याण विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, व पाणीपुरवठा विभाग सहभागी होणार असून सर्वांच्या समन्वयाने ही व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येईल, असेही श्री.येरेकर यांनी सांगितले.

### काय आहे एफ.टी.के

एफ.टी.के. (Field Testing Kit) हा एक पोर्टेबल तपासणी संच आहे. या किटद्वारे पिण्याच्या पाण्यातील पीएचस्तर, क्लोरिन, नायट्रेट्स, फ्लोराइड, क्लोराईड, लोह, अल्कॉलिनिटी, गढूळपणा, हार्डनेस, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम तसेच जैविक प्रदूषणाची तात्काळ तपासणी करता येते. यामुळे गावपातळीवर नागरिकांना पाण्यातील अशुद्धता ओळखता येते व आवश्यक उपाययोजना शक्य होते.

# जागतिक कासव दिन

२३ मे हा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप म ानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रूप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे, पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे. आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत.

कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे. पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात. ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावर आढळतात. ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे.

कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात. चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रिडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते. कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरून कासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे, शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उदेश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.

# दिव्यांग संगणक परिचालकाचे अन्यायकारक निलंबन, पुन्हा सेवेत घ्या अन्यथा अन्यायाविरुद्ध तीव्र आंदोलन



नगर – वडझिरे (ता. पारनेर) ग्रामपंचायतीत कार्यरत असलेल्या दिव्यांग संगणक केंद्र चालक राजेश शिवाजी शेंडकर यांना कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता अचानकपणे बेकायदेशीररीत्या निलंबित करण्यात आले आहे. या अन्यायकारक निर्णयाविरोधात प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन शेंडकर यांना तात्काळ सेवेमध्ये पुन्हा समाविष्ट करण्याची मागणी केली आहे.

राजेश शेंडकर हे २०१८ पासून वडझिरे ग्रामपंचायतीमध्ये संगणक केंद्र चालक म्हणून प्रामाणिकपणे सेवा देत आहेत. शेंडकर व त्यांची पत्नी दोघेही दिव्यांग असून त्यांच्यावर आजवर कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही. मात्र, ग्रामपंचायतीने पदाचा गैरवापर करून बिनबुडाच्या आरोपांच्या आधारे त्यांचे निलंबन केले आहे. विशेष म्हणजे, या निलंबनापूर्वी त्यांना कोणतीही नोटीस देण्यात आली नाही, तसेच कोणतीही कायदेशीर सुनावणी देखील झालेली नाही.

शेंडकर कुटुंब पूर्णपणे या नोकरीवर अवलंबून आहे. त्यांच्या निलंबनामुळे दोघा दिव्यांग पती–पत्नीसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. आजवर कोणताही दोष नसताना केवळ वैयक्तिक द्वेषातून त्यांच्यावर अन्याय झाला असल्याचा आरोप स्थानिक संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. राजेश शेंडकर यांना तत्काळ सेवेत समाविष्ट करण्यात यावे, अन्यथा दिव्यांग बांधवांवर होणाऱ्या या अन्यायाविरुद्ध प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष ॲड. पोकळे यांनी दिला आहे.

# जिल्हा बँक भरतीप्रकरणी संचालक मंडळास नोटिसा बजावण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

नगर – जिल्हा सहकारी बँकेतील भरतीत घोटाळा झाल्याचा आरोप करणाऱ्या याचिकेची मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दखल घेतली असून बँकेचे अध्यक्ष व भाजपाचे आ. शिवाजी कर्डिले यांच्यासह सर्व संचालकांना नोटिसा बजावण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहे.

जिल्हा सहकारी बँकेवर भाजपचे नेतृत्व आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात बँकेत राबवलेल्या ६९० जागांच्या भरती प्रक्रियेमुळे बँक आणि बँकेचे नेतृत्व आता चर्चेत आले आहे. या भरती प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याचा आरोप करणारी याचिका दोन उमेदवारांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात दाखल केली. त्याची दखल घेत न्यायालयाने नोटीस बजावण्याचा आदेश काढला आहे. याचिकाकर्ते उमेदवार विशाल गोरे आणि राजेंद्र वैराळ यांनी बँकेचे अध्यक्ष आणि संचालक मंडळाने त्यांच्या मर्जीतल्या विद्यार्थ्यांना जास्त गुण देऊन मुलाखतीसाठी पात्र केल्याचा गंभीर आरोपासह वेगवेगळे मुद्दे उपस्थित करत न्यायालयाचे लक्ष याचिकेमार्फत वेधले.

या भरती प्रक्रियेत आरक्षण लागू केले नाही. सहकारी बँकांसाठी राज्यस्तरीय कृती दलाने दिलेल्या सूचनांचे पालन केलेले नाही. त्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिया बेकायदा असल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे. ही प्रक्रिया रद्द करण्याची विनंती देखील याचिकाकर्त्यांनी न्यायालयाकडे केली. न्यायमूर्ती अरुण पेडणेकर यांनी याचिकाकर्त्यांची दखल घेत राज्य सरकार, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक मंडळ आणि वर्कवेल इन्फोटेक कंपनीला नोटीस बजावण्याचा आदेश दिला.

ॲड. योगेश खालकर आणि ॲड. निलेश भागवत यांनी याचिकाकर्त्यांतर्फे तर ॲड. एस. पी. सोनपावले यांनी सरकारतर्फे न्यायालयात काम पाहिले.

# 'परित्यक्ता सवलती'खाली बदलीचा लाभ घेण्याकरिता पुराव्याचा स्पष्ट खुलासा करावा : चंद्रशेखर पंचमुख



नगर – सन २०२४–२५ या होणाऱ्या प्राथमिक शिक्षकांच्या बदलीमध्ये संवर्ग १ या घटकातील परित्यक्ता याबाबत कोणते पुरावे ग्राह्य धरावेत याबाबत स्पष्ट खुलासा अद्यापही केलेला नसून अहिल्यानगर जिल्ह्यात याबाबत आम्ही एक महिन्यापूर्वी शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना निवेदन देऊन तक्रार केली होती. याबाबत वेळोवेळी पाठपुरावा केला परंतु शिक्षणाधिकारी हे उडवाउडवीचे उत्तरे देऊन आम्हाला पत्र पाठवत आहे. परितक्त्या यांना बदलीतील संवर्ग १ चा लाभ घेण्याकरिता फक्त साधी नोटरी वर स्वयम घोषणापत्र सादर करणे एवढेच कागदपत्र पुरावा आवश्यक आहे का? एवढे असल्यास लेखी देऊन ते प्रसिद्ध करावे असे सुचविले असताना त्यांनी हात वर केले या अशा सभ्रमात ठेवून बदली प्रक्रिया पारदर्शी होणे शक्य नाही. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यात अनेकांनी खोट्या नोटरी करून जमा केलेल्या आहे व अधिकाऱ्यांना हे सर्व माहीत असून देखील ते गप्प आहे याचाच अर्थ असा की या सर्व खोट्या नोटरी केलेल्या शिक्षकांना साहेबांचा आशीर्वाद आहे.

अहिल्यानगरमधील परितक्त्या या खोट्या असून त्याची थोडीशी चौकशी केली तरी सत्य बाहेर येऊन खूप मोठा स्कॅम उघडकीस येईल व परितक्त्या बाबत कोणते सबळ पुरावे ग्राह्य धरावीत. याबाबत बदल्या होण्यापूर्वी आदेशित करावे जेणेकरून या होणाऱ्या खोट्या बदल्या थांबल्या जातील व खरे लाभधारक लाभ घेतील व हे खोटी नोटरी करणाऱ्यांवर कारवाई करून गुन्हे दाखल कराव्यात. यामुळे असे खोटे कागदपत्र तयार करणारी टोळी सापडेल व अधिकारी वर्गालाही दोषी ठरवण्यात येऊन त्यांनाही दंडीत करण्यात यावे अशी मागणीचे निवेदन शिक्षण आयुक्तालय, आयुक्त पुणे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सामाजिक न्याय विभाग तालुका अध्यक्ष चंद्रशेखर रावसाहेब पंचमुख यांनी दिले आहे.

# अमृतवाहिनी आय.टी.आय.च्या २९ विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षेपूर्वी मेगाकोट सरफेस ट्रीटमेंट, सिन्नर, नाशिक कंपनीमध्ये निवड

संगमनेर – अमृतवाहिनी आय.टी.आय. अमृतनगर, संगमनेर येथे २१ मे रोजी मेगाकोट सरफेस ट्रीटमेंट, सिन्नर, नाशिक येथील कम्पनींचा कॅम्पस इंटरव्ह्यू नुकताच पार पडला. मेगाकोट सरफेस ट्रीटमेंटचे संदीप सायखिंडिकर डी. जी.एम. ऑपरेशन, संग्राम जाधव एच. आर. हेड यांनी अंतिम वर्षाच्या मेकॅनिक मोटर व्हेईकल, मेकॅनिक डिझेल, फिटर, इलेक्ट्रिशियन, वायरमन, कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट या ट्रेडच्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या, त्यापैकी एकूण २९ विद्यार्थ्यांची निवड झाली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण मिळावे, यासाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी अमृतवाहिनी आय.टी.आय. ची स्थापना १९८४ साली केली. संस्थेने गुणवत्तेत सातत्य राखल्याने संस्थेचा नावलौकिक वाढला आहे. येथील शैक्षणिक वातावरण, निसर्ग सुंदर परिसर, शिस्त, स्वच्छता तसेच विद्यार्थ्यांना प्लेसमेंट व आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात साहेब, विश्वस्त डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त सौ.शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डायरेक्टर अकॅडेमिक डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य व्ही. व्ही. भाटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. इंटरव्ह्यू यशस्वी होण्यासाठी ट्रेनिंग व प्लेसमेंट विभाग व सर्व स्टाफने परिश्रम घेतले आहे.

# औषधी व सुगंधी वनस्पती लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी अर्ज करावेत

नगर – औषधी व सुगंधी वनस्पती लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी ारहरवलींरहरळीं.सीं.ळप या महाडीबीटी पोर्टलवर फलोत्पादन घटकांतर्गत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत औषधी व सुगंधी वनस्पती लागवड हा घटक नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे. सन २०२५–२६ साठी ४ कोटी ४० लाख रुपयांच्या वार्षिक आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे.

मुलेठी, शतावरी, कालीहारी, कळलावी, सफेद मुसळी, गुग्गुळ, मंजिष्ठा, कुटकी, अतिस, जटामासी, अश्वगंधा, ब्राह्मी, तुलसी, विदारीकंद, पिंपळी, चिराटा व पुष्करमूळ या औषधी वनस्पतीच्या लागवडीसाठी प्रती हेक्टर १ लाख ५० हजार रुपयांचा मापदंड असून, सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४० टक्के व अधिसूचित क्षेत्रामध्ये ५० टक्के अर्थसहाय्य देय आहे. लागवड साहित्य व आयएनएम, आयपीएमचा खर्च २ हेक्टरच्या मर्यादेत २ आठवड्यांमध्ये देय आहे.

गुलाब, रोझमेरी, निशिगंध, जिरेनियम, कॅमोमाईल, चंदन, दवणा, जाई व लॅव्हेंडर या महत्त्वाच्या सुगंधी वनस्पतींच्या लागवडीसाठी प्रती हेक्टर १ लाख २५ हजार रुपयांचा मापदंड असून, सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४० टक्के व अधिसूचित क्षेत्रामध्ये ५० टक्के अर्थसहाय्य देय आहे. लागवड साहित्य व आयएनएम, आयपीएमचा खर्च २ हेक्टरच्या मर्यादेत २ आठवड्यांमध्ये देय आहे. इतर सुगंधी वनस्पतींमध्ये पामरोसा, गवती चहा, तुळस, व्हेटीव्हर, जावा, सिट्रोनेला, गोड तुळशीपत्र यांच्यासाठी ५० हजार रुपयांचा मापदंड असून, सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४० टक्के व अधिसूचित क्षेत्रामध्ये ५० टक्के अर्थसहाय्य देय आहे. लागवड साहित्य व आयएनएम, आयपीएमचा खर्च २ हेक्टरच्या मर्यादेत २ आठवड्यांमध्ये देय आहे.

# विशेष सहायक अभियोक्ता पदासाठी २ जुनपर्यंत अर्ज सादर करावेत

नगर – जिल्ह्यातील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांच्या न्यायालयातील फौजदारी विभागाचे विशिष्ट खटल्यांच्या कामासाठी १६ विशेष सहायक सरकारी अभियोक्त्यांचे पॅनल तयार करण्यात येणार आहे. यासाठी तात्पुरत्या स्वरुपातील विशेष सहायक अभियोक्ता पदासाठी इच्छुकांनी विहित नमून्यातील अर्ज २ जुनपर्यंत सादर करण्याचे आवाहन सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता अनंत चौधरी यांनी केले आहे.

विशेष सहायक अभियोक्ता पदासाठी अर्जदार हा भारताचा नागरिक असावा. अर्जदाराचे वय ४३ वर्षापेक्षा अधिक नसावे. उमेदवार मान्यताप्राप्त विधी शाखेची पदवी धारण करणारा असावा. वकील म्हणून नोंदणी केलेला व कमीत कमी ५ वर्षे फौजदारी प्रकरणे न्यायालयामध्ये चालविण्याचा अनुभव असावा. विशेष सहायक सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणतीही पूर्वसुचना न देता केव्हाही संपुष्टात आणण्यात येईल. विशेष सहायक अभियोक्ता यांच्य नेमणूका नागरी सुरक्षा संहिता कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार विशेष फौजदारी प्रकरणांसाठी असली तरी त्यास नेमून दिलेल्या न्यायालयातील बोर्डावरील दैनंदिन फौजदारी प्रकरणे हाताळणे आवश्यक राहील.

विशेष सहायक अभियोक्त्यांचे काम असमाधानकारक असल्याचे निष्पन्न झाल्यास किंवा त्यांच्याविरुद्ध तक्रार प्राप्त झाल्यास त्यांना कोणतीही पूर्वसुचना न देता त्यांची तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती रद्द करण्यात येईल. तात्पुरत्या स्वरुपातील पॅनलवर निवड झालेल्या विशेष सहायक अभियोक्त्यांची जिल्ह्यातील कोणत्याही न्यायालयात काम करण्याची तयारी असावी. त्यांना अन्य कोणत्याही प्रकरणांत खाजगी व्यक्तीतर्फे खटल्यात काम करता येणार नाही. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांने चालविलेल्या फौजदारी प्रकरणांच्या कामाबाबतचा मासिक अहवाल सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, अहिल्यानगर यांचेकडे सादर करावा.

सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, अहिल्यानगर हे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांचे पर्यवेक्षी व नियंत्रण अधिकारी असतील व त्यांच्या सुचनांचे व आदेशाचे पालन करण हे निवड झालेल्या तात्पुरत्या स्वरुपातील पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना बंधनकारक असेल. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून शासनाचा पूर्णवेळ सेवक म्हणून नियुक्ती नसल्याने तात्पूरत्या स्वरुपाचे पॅनलवर कितीही वर्ष काम पाहिले तरी त्यांना नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदावर हक्क सांगता येणार नाही. तसेच या कालावधीत फायदा अन्य कोणत्याही शासकीय पदांचे नियुक्तीकामी वयोमर्यादेतील सुट म्हणून घेता येणार नाही. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना शासकीय पदाचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत. अहिल्यानगर जिल्ह्यातील सध्या कार्यरत असलेल्या विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना या पॅनलसाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना प्रतिदिनी परिणामकारक सुनावणीसाठी १ हजार २०० रुपये फिस देण्यात येईल. एका जामीन अर्जाच्या विरोधाकरिता ८०० रुपये, प्रतिदिनी एकूण कमाल मर्यादा २ हजार रुपये देण्यात येतील. एकापेक्षा जास्त सुनावणी किंवा जामीन अर्जाच्या विरोधाचे काम चालविले तरी प्रतिदिन कमाल मर्यादा २ हजार रुपये एवढी राहील. प्रस्तावित तात्पुरत्या स्वरुपातील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यास कोणत्याही परिस्थितीत प्रतिदिनी एकूण २ हजार रुपयांपेक्षा अधिक मानधन अनुज्ञेय नाही.

तात्पुरत्या स्वरुपात तयार करण्यात येणाऱ्या पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदासाठी विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयीन वेळेत अथवा समक्ष सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडी, अहिल्यानगर येथे तीन प्रतीत सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नसल्याचेही कळविण्यात आले आहे.

# धर्म–जात–अक्कलमारीचे राजकारण संपवा, लोकभज्ञाकशाहीची मशाल पेटवा; विज्ञान, नीतिमत्ता आणि पर्यावरणाचा समन्वय साधणारे लोकशाही तत्त्वज्ञानची गरज

नगर – भारतीय लोकशाही आज एका निर्णायक वळणावर उभी आहे. जिथे निवडणूक ही केवळ सत्ताधाऱ्यांची अदलाबदल नसून, ती राष्ट्राच्या विचारधारेचा पुनर्जन्म ठरू शकते. मात्र दुर्दैवाने, मतदार धर्म–अक्कलमारी आणि मतदार जात–अक्कलमारी या संकल्पना आजही भारतीय लोकशाहीच्या मुळावर घाव घालत आहेत. स्वार्थ, जातीयता आणि धार्मिक ध्रुवीकरणाच्या मोहजाळात अडकलेल्या मतदार मानसिकतेमुळे विद्वत्तेला, दृष्टीकोनाला आणि मूल्याधिष्ठित राजकारणाला मागे टाकले जात असल्याचा आरोप पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने करण्यात आला आहे.

स्वातंत्र्यानंतर संविधान लिहिणारे, लोकशाहीचे खरे पुरस्कर्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देखील या विकृत मतदार वृत्तीचा फटका बसला. त्यांनी आयुष्यभर दलित, वंचित आणि सामान्य जनतेसाठी लढा दिला. परंतु लोकसभेच्या निवडणुकीत, विद्वत्ता व कार्यपेक्षा जात–धर्माच्या आधारे मतदान झाले आणि त्यांचा पराभव झाला. हे केवळ एका नेत्याचा नाही, तर लोकशाहीच्या मूल्यांचा पराभव ठरला.

राजकारण केवळ पैसा, प्रतिष्ठा, प्रसिद्धी आणि कुटुंबासाठी करणाऱ्या सत्तापेंढारींनी अनेक वर्षे जनतेला बहिण–बेटी योजना, जाती–धर्माच्या नारेबाजीने भुलवलं. पण आता या खेळाचा शेवट झाला पाहिजे. भारताला नवे सरकार नाही, तर नवी राजकीय जाणीव, सजग मतदार, आणि उंचावलेली लोकशाही हवी असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

आज भारतासमोर हवामान बदल, पाण्याची टंचाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि सामाजिक विघटन यांसारख्या गंभीर समस्या आहेत. यावरचा उपाय आहे एकत्रित ज्ञानसिद्धांत, हा सिद्धांत विज्ञान, नीतिमत्ता, पर्यावरण, अध्यात्म आणि तर्कशक्ती यांचा समन्वय साधतो. मतदान ही केवळ एक प्रक्रिया नाही, ती एक सांस्कृतिक आणि नैतिक क्रांती असली पाहिजे. प्रत्येक निवडणूक म्हणजे एक नवीन वाटचाल ही राष्ट्राच्या मूल्यांची आणि जनतेच्या प्रतिष्ठेची परीक्षा आहे. जर मतदारांनी भीती, लोभ, जात आणि धर्माच्या पलीकडे पाहून मतदान केलं, तर भारत सुजलाम सुफलाम, निसर्गस्नेही आणि ज्ञानाधिष्ठित राष्ट्र बनू शकणार असल्याची भावना ॲड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केली.

मतदानाचे मार्गदर्शक तत्त्व व सजग नागरिकांसाठी निसर्गपाल नेत्यांना मतदान करा जे निसर्ग, प्राणीमात्र आणि समाजासाठी निःस्वार्थ झटतात, रेन गेन बॅटरी क्रांतीला पाठिंबा द्या, ही कल्पना हवामान बदल, पाण्याची टंचाई आणि जैवविविधता संकटावर उपाय शोधते, लोकभज्ञाक उमेदवारांची निवड करा, जे लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती या तत्त्वांवर काम करतात. जातीय, धार्मिक आणि घराणेशाहीच्या पक्षांना नकार द्या, जे मतांची तिजोरी भरून जनतेला विसरतात, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

नव्या भारतासाठी माझं जीवन, माझं झाड, माझी रेन गेन बॅटरी..., जय किसान, जय निसर्गपाल..., मतदान हेच महादान, लोकभज्ञाकशाहीसाठी मतदान करा...! या नव्या घोषणा संघटनेच्या वतीने जारी करण्यात आल्या आहेत.

